LINOPINION PUBLIC RELATIONS

LOWE LINTAS

| PUBLICATION | NAVSHAKTI |
|---|---|
| EDITION | MUMBAI |
| DATE | 31-07-2010 |
| PAGE NO | 10 |

# उद्योजकांना गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात चांगले वातावरण

## मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**

मुंबई, शुक्रवार - उद्योजकांना प्रोत्साहन देण्याचे राज्य शासनाचे धोरण असून उद्योजकांना गुंतवणुकीसाठी राज्यातील वातावरण निश्चितच चांगले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी केले. नव्या उद्योजकांचे राज्यात नेहमीच स्वागत केले जाईल, असेही ते म्हणाले.

भारतातील पॉलिफ्लेक्स कंपनीसमवेत इटलीच्या मॅग्निफ्लेक्स कंपनीने भागीदारी केली आहे. यानिमित्त येथील हॉटेल आयटीसी ग्रँडमध्ये काल आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मॅग्निफ्लेक्सचे जागतिक विक्री व्यवस्थापक मार्को मॅग्नी आणि पॉलिफ्लेक्स कंपनीचे अध्यक्ष बलराम निचानी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, इटलीच्या मॅग्निफ्लेक्सने भारतातील पॉलिफ्लेक्सबरोबर केलेली भागीदारी निश्चितच स्वागतार्ह आहे. भारत आणि इटलीतील संबंध नेहमीच सौहार्दाचे राहिले असून औद्योगिक भागिदारी आणि गुंतवणुकीद्वारे ते अधिक वृद्धिंगत होत आहेत. दोन कंपन्यांबरोबर दोन देशही जवळ येत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

भारतीय बाजारपेठेत प्रवेश करताना आम्हाला अतिशय आनंद होत असून आमच्यासाठी ही बाजारपेठ अतिशय महत्त्वाची आहे. भागिदारीतून आम्हाला निश्चितच चांगले परिणाम मिळतील, अशी अपेक्षा मॅग्नी यांनी यावेळी व्यक्त केली.

भारतीय ग्राहकांना आरामासाठी जागतिक दर्जाची उत्पादने उपलब्ध व्हावीत म्हणून आम्ही इटलीतील जागतिक दर्जाच्या कंपनीबरोबर भागीदारी करीत आहोत. भारतीय ग्राहकांना याचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास निचानी यांनी व्यक्त केला. यावेळी भागीदार कंपनीच्या नव्या उत्पादनांचे अनावरणही करण्यात आले.